साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०३ नोव्हेंबर २०२५ * पाने-४ * २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशु प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.

# परळीत नगराध्यक्षपदाची उमेदवारी मिळणार कोणाला?

## नागरिकांची उत्सुकता शिगेला..!

**परळी वैजनाथ (लक्ष्मण वाकडे) :- सर्वसाधारण महिला उमेदवारासाठी राखीव असलेल्या परळी पालिकेच्या अध्यक्षपदाच्या थेट नागरिकांतून होणाऱ्या निवडणुकीसाठी निवडणूक रिंगणात कोण-कोण उतरतात. महायुती व महाविकास आघाडीकडून कोणाला उमेदवारी मिळते? याची उत्सुकता आता परळीकरांना लागली आहे. या निवडणुकीचा बिगूल लवकरच वाजणार असल्याने उमेदवारीसाठी कार्यकर्त्यांचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत.**

सुमारे नऊ वर्षानंतर परळी पालिकेची निवडणूक होत आहे. गेल्या निवडणुकीप्रमाणे याही वेळी परळी पालिकेचे अध्यक्षपद महिला उमेदवारांसाठी राखीव आहे. ही निवडणूक थेट जनतेतून होणार आहे. आपल्या पत्नीला, आईला, बहिणीला नगराध्यक्ष पदाची उमेदवाराची मिळावी म्हणून अनेक कार्यकर्ते सध्या प्रयत्न करत आहेत. नगराध्यक्ष पदाची उमेदवारी पदरात पाडून घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडे (अ.प.गट) इच्छुकांची मोठी गर्दी आहे. भाजपकडूनही काही कार्यकर्ते निवडणुकीसाठी तयार आहेत. या शिवाय नगरसेवक पदासाठी उमेदवारी मिळावी म्हणूनही दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या पक्षाच्या नेत्यांकडे जोरदार फिल्डींग लावली आहे. कार्यकर्त्यांच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या या निवडणुकीसाठी उमेदवारी द्यावी कुणाला? हा प्रश्न सध्या महायुतीच्या नेत्यांपुढे आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी बाबत कार्यकर्त्यांच्या मुलाखतीही घेतल्या जात आहेत. परंतु अद्याप उमेदवारांची नावे निश्चित झालेली नाहीत.

महाविकास आघाडीकडेही नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी उमेदवारी मागणाऱ्यांची संख्या मोठी आहे.



यासाठी आघाडीने अर्जही घेतले आहेत. महाविकास आघाडीचे नेते एकत्र बसून उमेदवारीबाबत निर्णय घेणार आहेत. नगराध्यक्षपदासाठी महायुतीकडून बाजीराव धर्माधिकारी, शेख सिराज, राजा सोनी, बाळू लड्डा, राजा गुत्तेदार आदींची नावे पुढे आली आहेत तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई यांच्या पत्नी किंवा मुलीला उमेदवारी मिळेल असे चित्र आहे. या निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर झाल्यानंतर उमेदवारांची नावे निश्चित होतील. दरम्यान वंचित बहुजन आघाडीही या निवडणुकीसाठी परळीतून उमेदवार उभे करणार आहेत असे सांगण्यात आले.*

# डॉ.संपदा मुंडे प्रकरणी बुधवारी परळीत जनआक्रोश मोर्चा

## सुषमाताई अंधारे यांच्यासह संपदाच्या कुटुंबियांची उपस्थिती

**परळी वैजनाथ, (बातमीदार):- बीड जिल्ह्याची लेक डॉ.संपदा मुंडे यांचा झालेला संशयस्पद मृत्यू या प्रकरणी राज्यभर संतापाची लाट असताना या प्रकरणाचा तपास योग्य पद्धतीने व्हावा यासाठी परळीकरांच्या वतीने जनआक्रोश मोर्चा बुधवार, दि.५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे.**

राणी लक्ष्मीबाई टॉवर पासून ह्या मोर्चाला सुरुवात होउन मोंढा मार्केट, एकमीनार चौक मार्गे रेल्वे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापाशी समारोप होईल. डॉ.संपदाच्या न्यायिक लढ्यासाठी सातत्याने लढत असलेल्या सुषमाताई अंधारे व संपदाचे कुटुंबीय या मोर्चात सहभागी होणार आहेत. सदरील मोर्चाद्वारे डॉ.संपदा मुंडे प्रकरण बीड येथे वर्ग करण्यात यावे, सर्व संशयितांची सखोल चौकशी करण्यात यावी, संपदा मुंडे यांनी वेळोवेळी केलेल्या तक्रारीची पोलीस व आरोग्य विभागाकडून वेळेत दखल न घेतलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सखोल चौकशी करीता एक चौकशी समिती स्थापन करण्यात यावी यासह विविध मागण्या घेऊन परळीकर रस्त्यावर उतरणार आहेत. या मोर्चामध्ये लहान थोरांसह हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान परळीकरांच्या वतीने करण्यात आले आहे. **

बचत विजेची समृद्धी राष्ट्राची !

## दिवाळी सुट्टीनंतर सोमवार पासून शाळा गजबजणार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- दिवाळीच्या सुट्टीनंतर येत्या सोमवार (दि.३) पासून बीड जिल्ह्यातील शाळा पुन्हा गजबजणार आहेत. १६ ऑक्टोबर पासून शाळांना दिवाळीची सुट्टी सुरू झाली होती. यंदा २१ दिवसाच्या दिवाळी सुट्टया दिल्या नाहीत यामुळे शिक्षक, विद्यार्थ्यांचा हिरमोड झाला. दिवाळीच्या सुट्टीनंतर येत्या सोमवारपासून पुन्हा शाळा गजबजणार आहेत. सोमवारपासून शाळा सुरू होणार असल्याने शाळां-शाळांतून या सत्राची तयारी केली गेली आहे. **

# वाचनीय दर्जेदार दिवाळी अंकाची परंपरा सा.'परळी परिसर'ने जपली..!

परळी वैजनाथ (बातमीदार):- गेल्या नऊ वर्षापासून परळी येथून नियमित प्रकाशित होणाऱ्या सा.परळी परिसर च्या नवव्या दिवाळी अंकाने आपल्या वाचनीय व दर्जेदार दिवाळी अंकाची परंपरा यंदाही जपली आहे.

दिवाळी अंकाच्या फराळगर्दीत आपले वेगळेपण व नाविन्यपण जपणाऱ्या सा.परळी परिसरने दिवाळी अंकाच्या माध्यमातून परळीतील सर्वसामान्यांचे प्रश्न व समस्या दिवाळीच्या लख्ख प्रकाशाप्रमाणे सर्वांसमोर याही अंकात निर्भीडपणे मांडून आपले सामाजिक दायित्व पुन्हा सिद्ध केले आहे. परळी सारख्या छोट्या शहरातून दर्जेदार दिवाळी अंक गेल्या नऊ वर्षापासून नियमित प्रकाशित करून या वर्तमानपत्राने सर्वसामान्य वाचकांच्या मनात मोठा विश्वास पुन्हा दृढ केला आहे. आपल्या पत्रकारितेचे निर्भीडपण व चांगुलपण जपले आहे. या चांगुलपणामुळे व विश्वासामुळे दरवर्षी दिवाळीला सा. परिसराच्या दिवाळी अंकाचे वाचक आतुरतेने वाट पाहत असतात. म्हणूनच या अंकाच्या विक्रीलाही मोठा प्रतिसाद मिळत असतो. काहीच दिवसात दिवाळी अंक हातोहात संपतातही, हे विशेष!

सा. परळी परिसराच्या यंदाच्या दिवाळी अंकात हजारो परळीकरांना मोठा




त्रास होणाऱ्या परळी पालिकेच्या गलथान कारभारावर विस्तृत 'कव्हर स्टोरी' करून सर्वसामान्याच्या भावनांना वाट करून दिली आहे. पालिका निवडणुकीच्या तोंडावर परळी पालिकेचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर मांडला आहे. परळी पालिकेची ही निवडणूक लढवणाऱ्या कार्यकर्त्यांना हा दिवाळी अंक मदतच करणार आहे, तो मार्गदर्शक ठरणार आहे. नगरसेवक झाल्यावर पालिकेच्या कारभाराबाबत नवी दिशा देणारा हा अंक असणार आहे. या कव्हर स्टोरी शिवाय या अंकात परळीच्या बस स्थानकाचा' प्रश्नही मांडला आहे. 'आईचा पदर' हे ललीत तसेच 'तोची माणूस ओळखावा'' हा चिंतनात्मक वैचारिक लेख याशिवाय 'कशी होऊ मी उतराई' हा स्त्रीच्या मनातील भावना प्रकट करणारा लेख छानच आहे. 'वारसा दीपोत्सवा'चा हा दिवाळीच्या संस्कृतीचा ठेवा जपणारा तसेच प्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या जीवनावरील लेख वाचकांना आवडतील, आनंद देतील असेच आहेत. 'एक होता ढप्या..' या बालकुमार कथासंग्रहाच्या कथा पुस्तकांचे केलेले परीक्षण, 'शिक्षण क्षेत्रातील परळीचे भूषण' हे दोन्ही लेख या दिवाळी अंकाची शान वाढवतात.परळी सह इतरही नव्या जुन्या कवींच्या कविता वाचकांची भूक भागवणार्या आहेत. एकूणच वाचनीय, दर्जेदार, आधुनिकतेचा टच असणारा, कृत्रिम बुद्धिमितीची जोड लाभलेला, पानोपाणी उत्तम मांडणी, रंगसंगती व आर्ट पेपर वरील बहुरंगी छपाई यामुळे हा दिवाळी अंक अधिक देखना, सुंदर झाला आहे. तो वाचकांच्या पसंतीला उतरणारा असाच आहे. अंक संपण्याआधीच या दिवाळी अंकाची प्रत वाचकांनी आपल्या वृत्तपत्र विक्रेत्यांकडून आजच घ्यायला हवी.

या दिवाळी अंकाचे प्रकाशन नुकतेच परळी शहरातील अग्रगण्य अशा लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्थेच्या कार्यालयात थाटात संपन्न झाले. या संस्थेचे मुख्य व्यवस्थापक नितीन वायचळे, अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष रामेश्वर महाराज कोकाटे, जिल्हाध्यक्षा राधिकाताई जायभाये, परळीचे शिक्षण भूषण डॉ.प्रा.वैजनाथ कानगुले, लोकमान्य पतसंस्थेचे सहव्यवस्थापक चंद्रशेखर सरकटे, स्वामी समर्थ पतसंस्थेचे अधिकारी बसवेश्वर खोत, संजय कळसकर व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत व त्यांच्या शुभ हस्ते हे प्रकाशन पार पडले. उपस्थित मान्यवरांनी प्रकाशनानंतर 'सा. परळी परिसर' च्या दिवाळी अंकाचे कौतुक करून वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत कार्यकारी संपादक व जेष्ठ पत्रकार लक्ष्मण वाकडे यांनी केले. या अंकास सहकार्य करणाऱ्या वाचक, विक्रेते, जाहिरातदार, लेखक, कवी तसेच सुधांशु प्रिंटर्स मधील कर्मचारी आदींचे आभार यावेळी श्री वाकडे यांनी मानले. या अंकाची मांडणी श्री दत्ता शिवगण यांनी सुरेख पद्धतीने केली आहे. श्री विठ्ठलराव साबळे, अनंत कुलकर्णी, शिवा कोडे, संजय कळसकर आदींनी या अंकाला व प्रकाशानाला मोठी मदत केल्याचे संपादक एस.एल.वाकडे यांनी सांगितले. ***

# परळी महाविकास आघाडीच्या वतीने परळी तहसील कार्यालयावर जोरदार निदर्शने

## डॉ.संपदा मुंडे यांच्या प्रकरणातील आरोपींना कडक शासन करा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- सातारा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.संपदा मुंडे पोलिसांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली होती. त्या आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी तहसील कार्यालयावर महाविकास आघाडीच्या वतीने निदर्शने करण्यात आली यावेळेस मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे नेते पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

परळी येथील महाविकास आघाडीच्या वतीने राज्य सरकारला परळी तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले या निवेदनात फलटण येथील अत्याचार पीडित डॉ. संपदा मुंडे यांची आत्महत्या नसून संस्थात्मक खून आहे. त्यातही कळस म्हणून मुख्यमंत्री स्वतः फलटणमध्ये सभा घेऊन संशयाच्या भवत्यामध्ये अडकलेल्या माजी खासदाराला भाषणामधून निर्दोष घोषित करतात. एकीकडे आरएमएस भाजप स्त्रियांचा सन्मानाच्या नावावाली विविध योजना राबवत आहे. पण हा फक्त दिखावा असून बार एस एस / भाजपशी संलप्रित प्रस्थापित सरंजामी गुंड प्रवृत्तीच्या नेत्याना राजकीय पाठबळ देऊन पोलिसी बळाचा गैरवापर करून महिलांप्रती असलेली त्यांची बुरसटलेली मनुवादी मानसिकता सिद्ध करत आहे.डॉ. संपदा मुंडे यांचा प्रश्न हा फक्त एका जातीचा किंवा जिल्ह्यापुरता मर्यादित नाही तर या घटनेमुळे घर सोडून शिक्षणासाठी नोकरीसाठी बाहेर राहणाऱ्या महिलांमध्ये प्रचंड प्रमाणामध्ये भीती निर्माण झालेली आहे. ही राजकीय प्रशासकीय गुंडगिरी थांबवून पारदर्शक चौकशीसाठी जिल्ह्याबाहेरील पोलीस आरोग्य विभागातील बरिष्ठ अधिकारी व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनुभवी महिला प्रतिनिधींचा या चौकशी समितीमध्ये समावेश असावा. ही चौकशी फक्त




आत्महत्या एवढ्या पुरती मर्यादित न ठेवता या घटनेमध्ये जे विविध पैलू समोर येत आहेत या पैलूंच्या सर्वांगाने चौकशी करणे गरजेचे आहे. व पिडितेची बदनामी करून तपास भरकटवण्याचे प्रयत्न तात्काळ थांबवावे असे नमूद असलेले निवेदन देण्यात आले. या निवेदनात१. विघडलेली कायदा सुव्यवस्था पुन्हा कायद्याच्या चौकटीत आणा,२. डखद ची घोषणा केल्याप्रमाणे तात्काळ निवेदनात मागणी केल्याप्रमाणे अधिकारी नेमून चौकशी सुरू करावी अशी मागणी करण्यात आली. या निदर्शनात कॉ. एस.घाडगे सर, कॉंग्रेस नेते ॲड अनिल मुंढे , शिवसेना नेते नारायण सातपुते, राष्ट्रवादीचे नेते उत्तम माने, प्रा.खाडे सर, जिल्हा उपाध्यक्ष देवराव लुगडे ,तालुका अध्यक्ष बाबासाहेब शिंदे,शहर अध्यक्ष ॲड.जीवन देशमुख, काँग्रेस अध्यक्ष बहादुर भाई,शिवसेनाचे जगन्नाथ सोळंके,शशी चौधरी,सुभाष देशमुख, इतेशाम खतिब,किरण सावजी,फिरोज सय्यद,दीपक शिरसाट,रणजीत देशमुख,वैजनाथ गाडेकर, इमरोज खान, महारुद्र कदम,विष्णू नागरगोजे, बद्दर भाई,बाळासाहेब गीते,रसूल खान, फरकुंद अली,फारूक, एडवोकेट अर्जुन सोळंके रमेश ढाकणे अदी महाविकास आघाडीचे नेते पदाधिकारी या निदर्शनात सहभागी झाले होते. ***

# डॉ.संपदा मुंडे हत्या प्रकरणी सखोल चौकशी करून न्याय द्या-वसंत मुंडे

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- डॉ.संपदा मुंडे यांच्या हत्या प्रकरणी महाराष्ट्रातील मोठ्या प्रमाणात खळबळ माजली असून यास राजकीय नेते व प्रशासन जबाबदार असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. प्रशासनामार्फत वेगवेगळ्या समित्या चौकशी करिता नेमल्या जातात पण त्यात राजकीय व प्रशासकीय हस्तक्षेप असल्यामुळे त्यांच्या कडून निपक्ष पणे संबंधित घटनेच्या मुद्देनिहा चौकशी केली जात नाही. स्वतः मुख्यमंत्री फलटणला जाऊन भाजपच्या राजकीय नेत्यांना चौकशी न करता अभय देतात.डॉ संपदा मुंडे ह्या गरीब शेतकरी कुटुंबातल्या असून मौजे कवडगाव तालुका वडवणी जिल्हा बीड येथील रोजंदारी करणारे कुटुंब आहे.

त्या कुटुंबावर खूप मोठ्या प्रमाणात संकट कोसळले असून यामध्ये जबाबदारी राजकीय नेते व प्रशासकीय यंत्रणेमार्फत दबावापोटी हॉटेल मधुदिप आत्महत्या केली नसून हत्या करण्यात आली आहे. या हातेश जबाबदार भाजपचे माजी खा. रणजीत सिंह नाईक निंबाळकर त्यांचे दोन पी ए, पीएसआय गोपाळ बदने घरमालक बनकर तसेच हॉटेलमध्ये संचालक दिलीप सिंह भोसले व त्यांचे कर्मचारी यांची संपूर्ण मुद्देनिहाय चौकशी करण्यात यावी व त्यांचे मोबाईल जप्त करून कॉल रेकॉर्डिंग तपासावेत अशी मागणी कॉंग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली. दवाखान्यात सेवेसाठी रात्री बेरात्री शवच्छेदानासाठी डॉक्टर मुंडे ला बोलावून घेऊन महिला असूनही त्रास दिला जात होता. भाऊबीजच्या दिवशी दिवाळी असतानाही २३ सप्टेंबर २०२६ ला तळहातावर सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली नसून हत्या करण्यात आली आहे ,यास सर्वशी राजकीय नेते व प्रशासन जबाबदार असून मेडिकल रिपोर्ट फिट प्रमाणपत्र बदलून देण्यासाठी मोठे शेडयंत्र रचून लैंगिक शारीरिक छळ मानसिक त्रास दिलेल्या असल्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशा मार्फत संपूर्ण प्रकरणाची निपक्ष पद्धतीने तपासणी मुद्देनिहाय करून कायदेशीर गुन्हेगारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी कॉंग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली. **

सा.परळी परिसर वार्षिक वर्गणीदार व्हा..!
-अंकासाठी संपर्क-
मो.९४२२३२८४९३

# बिचकुंदा ते श्रीक्षेत्र कपिलधार महापदयात्रेचे परळीत ॲड.मनोज संकाये यांनी केले स्वागत

परळी (प्रतिनिधी):- तेलंगणातील बिचकुंदा (ता. कामारेड्डी) येथून निघालेल्या श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी महापदयात्रेचे परळी वैजनाथ नगरीत उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. सद्गुरु श्री सोमलिंग शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ३५० किलोमीटर अंतराची ही महायात्रा २४ ऑक्टोबर रोजी बिचकुंदा येथून प्रारंभ झाली असून, येत्या ५ नोव्हेंबर रोजी बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र कपिलधार येथील श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी संजीवन समाधी दर्शन सोहळ्याने या यात्रेचा समारोप होणार आहे.सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी सद्गुरु श्री सोमलिंग शिवाचार्य महाराज यांचे दर्शन घेऊन त्यांचे स्वागत केले.

शुक्रवारी (३१ ऑक्टोबर) सायंकाळी पदयात्रा श्रीक्षेत्र वैद्यनाथ नगरीत दाखल झाली. या वेळी श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन भाविकांनी मंगल आरतीत सहभाग घेतला. मंदिर परिसरात फटाक्यांची आतिषबाजी व गुरुराज माऊली की जय, मन्मथ माऊली की जय अशा जयघोषांनी परळी दुमदुमली. त्यानंतर ही यात्रा अंबाजोगाईमार्गे श्रीक्षेत्र कपिलधारकडे मार्गस्थ झाली.

या यात्रेत महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश अशा चार राज्यांतील हजारो भाविक सहभागी झाले आहेत. सद्गुरु श्री सोमलिंग शिवाचार्य महाराज यांच्या प्रेरणेतून ही पदयात्रा दरवर्षी आयोजित केली जाते. धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारी ही यात्रा भक्तीभावाने भरलेली असून, प्रत्येक ठिकाणी श्रद्धाळूंकडून यात्रेचे स्वागत करण्यात येत आहे. परळी शहरातील उखळवेस परिसरासह विविध भागात भाविकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. श्री वक्रेश्वर मंदिरात चंद्रप्रकाश बुरांडे यांच्या वतीने पदयात्रेतील भाविकांसाठी प्रसादाची व्यवस्था करण्यात आली. ***

# परळी नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी सर्वसामान्यच महिलेला संधी मिळेल का?

**येत्या काही दिवसातच आपल्या परळी नगरपरिषदेची निवडणूक होत आहे. यावेळी नगराध्यक्ष पद सर्वसाधारण महिलेसाठी राखीव असून ते जनतेमधून निवडले जाणार असल्यामुळे या पदावर गर्भश्रीमंत व धनाढ्य व्यक्तींचा डोळा आहे. यावर्षीची परळी नगरपालिकेची निवडणूक निश्चितच परिवर्तनाची लढाई असणार आहे. सर्वसामान्य विरुद्ध धनाढ्य अशी ही लढाई असणार आहे. परळी वैजनाथ नगरपालिकेची निवडणूक जाहीर होताच पुन्हा एकदा 'कार्यकर्ते विरुद्ध घराणे' हा संघर्ष उभा ठाकला आहे. सत्तेच्या राजकारणात तळागळातील कार्यकर्त्यांचा आवाज नेहमीच दुय्यम ठरतो, आणि आता तर त्यावर पत्नीप्रेमाचे आच्छादन चढवले गेले आहे.**

एका धनाढ्य नेत्याची पत्नी म्हणून एका महिलेला नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी देण्याची चर्चा सुरू आहे. पण प्रश्न असा की त्या महिलेला राजकारणाचा अनुभव काय? कार्यकर्त्यांशी नाळ किती? नगरपालिका प्रशासनाचा काय अनुभव? तसेच समाजातील प्रश्न, स्थानिक पातळीवरील समस्या, प्रशासनाचा कारभार याची जाण किती? नागरी प्रश्नांची जाण व त्या कशा सोडवल्या पाहिजेत याविषयीचा अनुभव किती? या सर्व प्रश्नांची उत्तरे शून्य आहेत. तरी सुद्धा, केवळ नेत्याची 'पत्नी' असल्याचा लौकिक राजकारणात पात्रतेचे प्रमाणपत्र ठरतोय. हे लोकशाहीचे विडंबन नाही तर काय!

वर्षानुवर्षे कार्यकर्ते रस्त्यावर उतरतात, सभा भरवतात, बॅनर लावतात, लोकांशी संपर्क ठेवतात. पण उमेदवारीच्या वेळी त्यांच्या नशिबी फक्त सतरंज्या उचलणे आणि टाळ्या वाजवणेच येते. राजकारणातील हे 'सेलिब्रिटी संस्कृती'चे वर्चस्व आता स्थानिक पातळीवरही पसरले आहे. मेहनत करणाऱ्यांना तिकीट नाही, पण पैसेवाल्यांना, नात्याच्या ओळखीला, 'गर्भश्रीमंत घराण्यातील महिलेला' तिकीट मिळते. हा अन्यायाचा चेहरा आता राजकारणात मोठा होत चालला आहे. परळी शहरातील सुजाण नागरिकांनी व महिलांनी आता दररोजच्या नागरी समस्या सोडविण्यासाठी आपल्याबरोबर कोण काम करते, याबद्दल चिंतन करणे आवश्यक



आहे. एखादी महिला केवळ आर्थिकदृष्ट्या संपन्न व सक्षम आहे म्हणून तिला निवडणुकीच्या रिंगणात उतरवणे हा स्त्री म्हणून, कार्यकर्ती म्हणून, समाजकारणात झटणाऱ्या हजारो सर्वसामान्य महिलांचा हा अपमान आहे. आपण सर्व महिलांनी आपला आत्मसन्मान जपणे आवश्यक आहे. परळीकरांना शहराचा सर्वांगीण विकास करून घ्यायचा असेल तर आपल्याला सर्वसामान्य नेतृत्वाला पुढे आणले पाहिजे व त्याच्या हाती नगरपालिकेची सत्ता देण्याची गरज आहे. वर्षानुवर्षे एकाच घराण्याला सत्तेची ऊब देण्यामध्ये आपला परळीकरांचा काय विकास साध्य होणार आहे.

ज्यांनी वर्षानुवर्षे महिला बचतगट, गाव पातळीवरील विकासकामे, शैक्षणिक उपक्रम चालवले, नागरिकांच्या प्रश्नासाठी संघर्ष केला आहे. समाजकार्याला ज्यांनी वाहून घेतले आहे. त्यांच्याकडे राजकीय पक्षांनी कधीच पाहिले नाही. पण ज्यांच्या अंगावर साड्यांची किंमत आणि दागिन्यांची झळाळी आहे, त्यांनाच 'नेतृत्व' दिले जाते. या दिखाऊ सत्तेच्या प्रदर्शनात खरी महिला नेतृत्वाची ज्योत विझवली जात आहे. पक्षाचे वरिष्ठ नेते आणि संघटनांचे विचारवंत यांना विचारावेसे वाटते. कार्यकर्त्यांची किंमत केवळ मतदानाच्या दिवशीच आहे का? कार्यकर्त्यांचा सन्मान फक्त फलकांवरच दिसणार का? आर्थिक स्थिती, घराणे, नातेवाईकपणा हेच राजकीय निकष ठरणार असतील, तर लोकशाही हळूहळू एका 'कुटुंबशाही'च्या कचाट्यात अडकणार आहे.

सत्तेच्या या खेळात एक साधी, एकनिष्ठ, विचारवंत, संघर्षशील महिला आजही कोपऱ्यात उभी आहे तिला कुणी मंच नाही, कुणी मायक्रोफोन नाही, पण तिच्या डोळ्यांत अन्यायाविरोधी आग आहे. पक्षांनी तिच्या त्या आगीकडे पाहावे, तिच्या कार्याकडे न्यायाने पाहावे, हाच काळाचा आदेश आहे. जी महिला सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर येऊन आंदोलन करते व नगरपालिकेमध्ये आपला आवाज बनते अशा महिलेला राजकारणात नागरिकांनी पाठिंबा देऊन निवडून आणणे आवश्यक आहे. राजकारणाचा गंध नसलेल्या परंतु धनाढ्य महिलेला राजकारणात उतरवणे ही खरोखरच परळी शहराची गरज आहे का? याचा आपल्याला विचार करावा लागणार आहे. कारण सत्ता जर केवळ संपत्तीच्या आधारावर ठरू लागली, तर कार्यकर्त्यांचा संघर्ष, जनतेचा विश्वास आणि लोकशाहीचा आत्मा यांना ग्रहण पडेल. आपल्याला काही दिवसात एकत्र येऊन सर्वसामान्य परळीकरांचा आवाज बुलंद करण्यासाठी व सर्वसामान्यांना राजकारणात स्थान मिळावे यासाठी एकत्र यावे लागणार आहे !

**– सौ.चित्राताई देशपांडे**
परळी वैजनाथ.

संपादकीय...

# सहा महिन्यांचा पावसाळा...

**✻ सुविचार ✻**

**प्रत्येक झाडानं फळ द्यायला हवं हे गरजेचं नाही, एखाद्या झाडाची सावली सुद्धा खुप आधार देऊन जाते!**

यंदा गेल्या मे महिन्यापासून आपल्याकडे पाऊस बरसतो आहे. ऑक्टोबर संपत आला तरी पावसाचे बरसणे सुरूच आहे. आता बरोबर सहा महिने झाले पावसाळा थांबायचे नाव घेत नाही. मे महिना जसा तिव्र व कडक उन्हाळ्याचा तसा ऑक्टोबर महिना थंडीचा पण मे आणि ऑक्टोबर या दोन्ही महिन्यात पाऊस पडत असल्याने यंदा ऋतूचक्र बदलले, असेच सर्वसामान्य म्हणत आहेत. तब्बल सहा महिन्याचा पावसाळा यंदा आपण अनुभवतो आहोत. असा पावसाळा गेल्या अनेक वर्षात प्रथमच अनुभवल्याचे ज्येष्ठ मंडळी सांगत आहेत. आपल्याकडे जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे परंतु उन्हाळ्यात व हिवाळ्यात यंदा पडत असलेल्या पावसाने फायदा कमी नुकसान मात्र अधिकच केले आहे. मे महिन्यात पडलेल्या पावसाला आपण 'अवेळीचा' तर ग्रामीण भागात 'आवकाळी' पाऊस म्हणतात. असे एक दोन पाऊस होतात परंतु यंदा महिनाभर पाऊस पडल्याने या पावसाला काय म्हणावे? हा प्रश्न पडतो. त्याच प्रमाणे सप्टेंबर मध्ये पाऊस संपल्यानंतर व परतीचा पाऊसही येऊन गेल्यानंतर ऑक्टोबर मध्ये आपल्याकडे हिवाळा सुरू होतो. 'दिवाळी' थंडीतच असते. परंतु यंदा ऑक्टोबर मध्ये पाऊस पडत असल्याने हिवाळ्याची चाहूलच अद्याप लागली नाही. पडणाऱ्या पावसामुळे अद्याप पावसाळा संपलाच नाही असेच सर्वांना वाटते आहे. हिवाळ्यात बरसणाऱ्या या पावसाला काय म्हणावे? हा प्रश्नच आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या चक्रीवादळामुळे हा पाऊस पडत असल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु असे चक्रीवदळ आहे तरी किती दिवस? गेल्या काही दिवसांपासून धो-धो पाऊस बरसतो आहे. यामुळे शेतकरी मोठा अडचणीत सापडला आहे. अगोदरच ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये यंदा झालेल्या अतिवृष्टीने खरिपाचे मोठे नुकसान केले. या संकटातून शेतकरी बाहेर पडत असताना व रब्बी हंगामाची तयारी करत असताना पुन्हा पाऊस सुरू झाल्याने शेती व शेतकरी पुन्हा मोठ्या संकटात सापडला आहे. शेतात वेचणीला आलल्या कापसाच्या वाती या पावसाने केल्या आहेत. शेतात वाळू घातलेले सोयाबीन पावसाने भिजले आहे. रब्बीच्या पेरण्या खोळंबल्या आहेत. या पावसाने शेतकऱ्यांना सुधरच बसत नाही, असे झाले आहे. असे संकट शेती व शेतकरी उध्दवस्त करणारे आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेती करणे नकोसे झाले आहे. काही शेतकऱ्यांनी आपल्याकडे गहू, ज्वारी, हरभरे आदी रब्बीच्या पिकांचा पेरा केला होता. परंतु गेल्या दोन-तीन दिवसांत झालेल्या मोठ्या पावसाने अनेक शेतकऱ्यांचे बियाणे वाहून गेले आहे तर काही शेतकऱ्यांच्या शेतात पावसाचे पाणी साचल्याने हे बियाणे उगवेल की नाही? असा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे संकट पुन्हा वाढले आहे.

यंदाच्या पावसाळ्यातील अतिवृष्टी, पूर, ढगफुटी यामुळे शेती व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. राज्य सरकारने मदतीची घोषणा केली आहे. ही मदत बँकाकडे वर्ग केली आहे. परंतु अद्याप अनेक शेतकरी या मदतीपासून वंचित आहेत. कुठे केवायसी करा, कुठे नेट चालत नाही तर कुठे मोठी गर्दी, पुन्हा या...असेच प्रकार सुरू आहेत. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. सर्व शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत केंव्हा मिळणार असा प्रश्न आहे. या मदतीवर रब्बीसाठी बी, बियाणे, खते, औषधे घेण्याची तयारी अनेक शेतकऱ्यांची आहे, परंतु बँकाकडून मदत मिळण्यास विलंब होत असल्याने शेतकरी हताश झाला आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. दरम्यान, राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्त्यांनीही शेतकऱ्यांना सरकारची मदत मिळऊन देण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी होत आहे. ✻✻


# लोहपुरूष : सरदार वल्लभभाई पटेल

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती ३१ ऑक्टोबर. स्वातंत्र्यापूर्वी १७ प्रांत आणि ५६५ संस्थानांमध्ये विखुरलेल्या देशाला एका सुत्रात बांधण्याचे आव्हान त्यांनी यशस्वीरित्या पेलले होते. त्यामुळे त्यांची जयंती एकता दिवस म्हणून आपण साजरी करतो याबाबत हा विशेष लेख.

राष्ट्राचे पहिले गृहमंत्री आणि ज्यांना आपण लोहपुरूष नावाने ओळखतो ते सरदार वल्लभभाई पटेल यांचे कार्य आज नेमकेपणाने नव्या पिढीपर्यंत जायलाच हवे. नव्या समाज माध्यमांत ''रिल''च्या गुंत्यात अडकलेल्या या पिढीला एकता आणि एकात्मता याचाही अर्थ यानिमित्ताने कळेल.

आज आपण भाषावार प्रांत रचनेनुसार तयार झालेल्या राज्यांचे नागरिक आहोत आणि या राज्यांचा संघ म्हणजे आपला संघराज्य भारत देश होय. या विस्तीर्ण आसेतू हिमाचल भूमीवर १५० हून अधिक वर्षे कालावधीत ब्रिटिशांनी राज्य केले. त्यांनी त्या काळात देशात एकता नाही याची प्रथम माहिती झाल्यावर आपल्या सैन्याच्या ताकदीवर मोठी संस्थाने काबीज केली आणि इतरांवर त्याचा प्रभाव पडून अनेक संस्थानांनी ''ब्रिटीश राज'' स्वीकारले.

त्याही काळात ज्यांनी ब्रिटिशांना जुमानले नाही अशा संस्थानांमध्येृशींळवश  ठींश्रश अर्थात समाजात दुही निर्माण करून गृहकलह घडवायचा आणि संस्थानावर ताबा मिळवायचा अशी निती सुरू केली आणि



खरोखरच एकता नसल्यामुळे त्याकाळी ब्रिटीशांना यश मिळत गेले व आपल्या साम्राज्याची पकड मजबूत करण्यात यश मिळाले.

भारताची 'सोनेकी चिडिया' अशी ओळख होती. मात्र याला ब्रिटिशांनी आपल्या संपन्नतेसाठी वापरले. इथे असणाऱ्या साधन संसाधनांचा वापर त्यांनी सत्ता मजबूत करण्यासाठी आणि स्वत: संपन्न होण्यासाठी केला.

भारतभूमी म्हणून भारताचे त्याकाळी अस्तित्व संघराज्य म्हणून नव्हते तर त्याकाळी देशात अनेक राजे आणि त्यांची संस्थाने अशी स्थिती होती. देश कृषी संपन् आणि ग्रामीण जीवनात अधिक होता. कारखानदारी जवळपास नव्हती गावागावात बलुतेदारी असणारा तो काळ असल्याने गावातली गावकी आणि माणसं जपणारी गावं असं ग्रामीण भारताचं स्वरुप होतं.

भारत विभिन्न भाषा आणि संस्थानांमध्ये विखुरलेला असला तरी स्वातंत्र्यासाठी १८५७ च्या मंगल पांडे च्या उठावानंतर एकवटला गेला आणि देशात स्वातंत्र्याचा मोठा लढा सुरू झाला. ब्रिटिशांना याची दखल घ्यावी लागली आणि कधी सुर्यास्त न होणाऱ्या राणीच्या साम्राज्याचा सूर्यास्त होणार हे नक्की झाले. त्याही वेळी ब्रिटिशांनी फोडा आणि राज्य करा तंत्रावर जोर दिला मात्र दुसऱ्या महायुध्दाने प्रचंड नुकसान झाल्याने ब्रिटिशांना दुसरा पर्याय राहिला नव्हता.

**प्रशांत दैठणकर**
प्र.उपसंचालक (माहिती),
छत्रपती संभाजीनगर
तथा जिल्हा माहिती अधिकारी, बीड

यानंतरच्या काळात राष्ट्रभावनेने देशात सर्व ठिकाणी ब्रिटिशांविरूध्द चळवळ उभी राहीली. नंतरच्या काळात आधी लोकमान्य टिळक आणि त्यानंतर महात्मा गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली देशात एकसंघ होण्याची तयारी सुरू झाली होती. दर दहा कोसावर बदलणारी भाषा आणि काश्मीर ते कन्याकुमारी अशा आसेतु हिमाचल असणाऱ्या आपल्या देशात १२१ प्रकारच्या भाषा आणि सोबतच २७० मातृभाषा अशी विविधता असल्याने संभाषण ते समन्वय असा प्रवास अवघड असताना देशात स्वातंत्र्याच्या ओढीने एकात्मकतेची सुरूवात झाली होती.

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात ब्रिटिशांना कळून चुकले की भारताला आता स्वातंत्र्य द्यावेच लागणार आहे. त्यावेळी देखील त्यांनी धूर्तपणे खेळी खेळण्याचा प्रयत्न केला आणि देशाची फाळणी करतानाच सर्व संस्थानिकांना देशासोबत रहायचे की नाही याचा निर्णय संस्थानिकांनी घ्यावा असे सांगत गोंधळाची परिस्थिती निर्माण केली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्याची पहाट उजाडली त्यावेळी थेट ब्रिटिशांच्या ताब्यात असणारे १७ प्रांत आणि ५६५ संस्थानांमध्ये भारत विखूरलेला होता. यापैकी ३ वगळता सर्व संस्थानांनी भारतात सामील होण्याची मान्यता दिली.

केंद्रात त्यावेळी गृहमंत्री असणारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या समोर उर्वरित ३ संस्थानांबाबत निर्णय घेण्याचे आव्हान होते. यात पाकिस्तानच्या सिमेलगत असणारे काश्मीर तसेच जुनागढ आणि हैदराबाद संस्थान यांचा समावेश होता.

काश्मीर ताब्यात घेण्यासाठी पाकिस्तानने स्वातंत्र्य मिळताच प्रयत्न सुरू केले. यात मुस्लीमबहूल राज्य आणि हिंदू राजा अशी स्थिती असल्याने हा भाग आपण सहज मिळवू अशी पाकिस्तानची स्वप्ने होती. ज्यावेळी पाकिस्तानी टोळ्यांनी काश्मीरवर ताबा घेण्यासाठी हल्ला केला त्यावेळी राजा हरिसिंह यांनी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि गृहमंत्री सरदार पटेल यांची मदत घेतली.

नुकतेच स्वातंत्र्य मिळालेले असल्याने सैन्य रचना नसतानाही सरदार पटेल यांनी धोरणीपणाने मदत पाठवून पोलिसांच्या मदतीने टोळ्यांचे हल्ले परतविले आणि काश्मीर भारतात राहील याची खात्री केली. मात्र त्यावेळी काही केंद्रीय धोरणे चुकल्याने संपूर्ण स्वायत्तता देणारे कलम ३७० निर्माण करण्यात आले ज्यामुळे नंतरही त्या ठिकाणी हिंसाचार होत राहिला. केंद्रात सत्ता असलेल्या नरेंद्र मोदी यांच्या सरकारने कलम ३७० रद्द करून हा प्रश्न आता कायम सोडवला आहे.

इकडे हैदराबाद संस्थानात तेलंगाणा आणि मराठवाड्यासह विदर्भाचा काही भाग होता. हैदराबादच्या निजामाने भारतात येण्यास नकार दिल्याने '' देशांतर्गत देश'' असे गंभीर संकट समोर उभे होते. हैदराबाद संस्थानात स्वामी रामानंद तिर्थ यांच्या नेतृत्वात निजामाला विरोध करीत भारतात सामील होण्यासाठी मुक्तीसंग्राम सुरू झाला.

मराठवाडा मुक्तीचा हा लढा

(उर्वरित पान ३ वर)

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**
✻ वर्ष ०९ ✻ अंक २६ ✻ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ०३ नोव्हेंबर २०२५ ✻ किंमत : २ रु.

# परळीत होणार डिसेंबरमध्ये देशपातळीवरील भव्य पशुप्रदर्शन

मुंबई (जि.मा.का.बीड):- राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून परळीला देश पातळीवरील मोठा बहुमान मिळाला आहे. परळीच्या इतिहासात पहिल्यांदाच अनोखे व आगळे वेगळे असे देश पातळीवरील भव्य पशुपक्षी प्रदर्शन भरणार आहे. देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो हा परळीसाठी ऐतिहासिक बहुमान ठरणारा आहे. राज्यातील पशुपालकांसाठी आणि कृषी क्षेत्राशी निगडित पशुसंवर्धन उद्योगांसाठी एक मोठी उपलब्धी म्हणून परळी वैजनाथ येथे १० ते १२ डिसेंबर २०२५ दरम्यान महापशुधन एक्स्पो २०२५ हे देशपातळीवरील पशुपक्षी प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून होत असलेल्या या प्रदर्शनासाठी शासनाने ५ कोटी ८४ लाख रूपये मंजूर केले असून याबाबतचा शासनादेश निर्गमित करण्यात आला आहे. भारतीय पशुधन क्षेत्र हे जगातील सर्वात मोठे असून भारतात ११.६ टक्के पशुधन आहे. पशुपालन हा शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. महाराष्ट्रात पशुपालनातून शेतकऱ्यांना हमीपात्र उत्पन्न मिळत असून, ज्या भागात हा व्यवसाय प्रामुख्याने केला जातो, त्या भागात आत्महत्यांचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे आढळून आले आहे.राज्याच्या विकासात विदर्भ व मराठवाडा या भागांचा सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी) वाटा कमी असल्याने तेथील शेतकऱ्यांना व पशुपालकांना प्रोत्साहन देणे अत्यावश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून परळीत अखिल भारतीय पशुप्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे अखिल भारतीय पशुप्रदर्शन पशुपालकांना नवीन तंत्रज्ञान, उत्पादन क्षमता व प्रजनन क्षमता वाढविण्यासाठी प्रेरणा देणार आहे.

या प्रदर्शनात राज्यातील आणि राज्याबाहेरील देशभरातून विविध जातींचे जातीवंत व उत्कृष्ट पशुधन प्रदर्शित करण्यात येणार आहे. तसेच पशुसंवर्धन क्षेत्रातील व्यावसायिक, तज्ज्ञ आणि विविध संस्थांचे स्टॉल्स लावले जाणार असून अद्ययावत तंत्रज्ञान, उपकरणे आणि नव्या संधींची माहिती पशुपालकांना मिळणार आहे. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि अंमलबजावणी आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे. परळी वैजनाथ येथे होणारा हा महापशुधन एक्स्पो २०२५ राज्यातील पशुपालक, उद्योग, संशोधक आणि सामान्य नागरिकांसाठी एक प्रेरणादायी आणि ऐतिहासिक सोहळा ठरणार आहे. ✽✽

## ग्राहक पंचायत परळी शाखेच्या अध्यक्षपदी चित्रा देशपांडे यांची निवड



परळी वैजनाथ (बातमीदार):- अखिल भारतीय ग्राहक पंचायत परळी शाखेच्या अध्यक्षपदी चित्रा देशपांडे यांची निवड करण्यात आली आहे. देवगिरी प्रांताध्यक्ष डॉ.विलास मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत कार्यकारिणीची निवडण्यात आली. परळी महिला प्रमुख म्हणून विजया दहिवाळ, उपाध्यक्षपदी रामेश्वर महाराज कोकाटे, सहउपाध्यक्ष विद्या खिस्ते, सचिव गोपाळ आंधळे, सहसचिव संध्या सरोदे व प्रीती टाक, कोषाध्यक्ष तारावती अग्रवाल, प्रचारप्रसिद्धी प्रमुख श्री पद्माकर उखळीकर, पर्यावरण प्रमुख चेतन सौंदळे, लीगल सेल प्रमुख ॲड.अशोक शहाणे आदींची निवड करण्यात आली. ✽✽✽

(पान २ वरुन)... **लोहपुरूष : सरदार वल्लभभाई पटेल**

मोडून काढण्यासाठी निजामाने भाडोत्री रोहिले-पठाण यांचे सैन्य अर्थात रझाकारांची मदत घेतली. रझाकारांच्या या टोळ्या गावोगावी जाऊन जाळपोळ-हिंसाचार करून मुक्तीसंग्राम मोडून काढण्याचा प्रयत्न करीत होते. या मुक्तिसंग्रामाची दखल घेत सरदार पटेल यांनी पोलिस कारवाई केली ज्यामुळे निजाम शरण आला व देशाच्या स्वातंत्र्यानंतर १३ महिन्यांनी मराठवाड्यासह हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. त्याच पद्धतीने मग संधीपणाचा व राजकीय परिपक्वतेचा वापर करून सरदार पटेल यांनी जुनागढ संस्थान देखील भारतात विलीन करून घेतले. सरदार पटेल यांचा कणखरपणा देशाला एकत्र आणण्यात आणि एकता राखण्यासाठी महत्वाचा ठरला. नंतरच्या काळात भाषावार राज्यांची निर्मिती झाली. यात एकूण २२ भाषा मंजूर आहेत. बोलीभाषा भिन्न तसेच देशातील एकतेचा दुवा म्हणजे आपल्याकडील सण आणि उत्सव आणि याला एकसंघ करण्याचे काम करणारे सरदार वल्लभभाई पटेल होय. त्यांच्या या निर्णयांमुळे आज देशात एकता आहे आणि ही एकता पुढील काळातही राखावी लागणार हे नक्की. ✽✽✽

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई (दूरध्वनी क्रमांक ०२४४६-२४७७६०)**

ई-मेल:- ambejogai.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी क्रमांक (०२४४६) २४७७६०/२४९५७५

**ई-निविदा सुचना क्रमांक:- ब-१ एबीजे-०९/२०२५-२६ (ऑन लाईन)**

**(खुली निविदा)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई ई निविदा प्रणालीद्वारे निविदा मागवित आहेत. या ई निविदामध्य केज तालुक्यातील ०२, आणि अंबाजोगाई तालुक्यातील ०१ कामाचा समावेश आहे. सदर ब-१ नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविण्यात येत आहेत. ई-निविदेबाबतचा इतर संपूर्ण तपशील खालील संकेतस्थळावर (Web site) उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

**सुचना:-**

१. ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी https://mahatenders.gov.in या Portal वर enrolled करावे.
२. कोणत्याही किंवा सर्व कामाच्या ई-निविदा, कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.
३. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
४. ई-निविदा ऑनलाईन सादर करावयाच्या प्रक्रियेत कोणत्याही कारणामुळे अडथळा आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही.
५. वरील ई-निविदा सुचना ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या वेब साईटवर www.mahapwd.com पहावयास मिळेल.

स्वाक्षरीत/-

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**अंबाजोगाई**

संमा/छत्रपती संभाजीनगर/जाहिरात/विमाका/१६९/२०२५-२६

# शिक्षकांसाठी एआय साधने: शिक्षणात क्रांती घडवणारा एक विश्वासू सहकारी

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाने शिक्षण क्षेत्रात नवे क्षितिज उघडले आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) ही केवळ एक संकल्पना न राहता शिक्षकांसाठी एक उपयुक्त साधन बनली आहे. एआयच्या मदतीने शिक्षण अधिक सुलभ, आकर्षक आणि परिणामकारक बनवता येते. चला पाहूया शिक्षकांच्या दैनंदिन कामात उपयोगी पडणारी काही महत्त्वाची एआय साधने.

**सादरीकरण तयार करणे :-**

पूर्वी सादरीकरण तयार करणे वेळखाऊ आणि श्रमदायक काम होते. आता Gamma, SlidesAI, Canva, Curipod आणि Slidesgo यांसारख्या एआय टूल्सच्या मदतीने शिक्षक थेट विषय टाकून आकर्षक स्लाइड्स सहज तयार करू शकतात.

- विषयानुसार चित्रे, ग्राफिक्स आणि लेआउट्स सहज उपलब्ध होतात.
- तयार सादरीकरण PowerPoint किंवा Google Slides मध्ये सहज सेव्ह करता येते.

✽ **पाठाचे नियोजन** (Lesson Planning) :- Almanack, Eduaide, MagicSchool, Diffit आणि Brisk Teaching यांसारखी टूल्स शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या स्तरानुसार आणि वेळेच्या गणनेनुसार प्रभावी पाठयोजना तयार करण्यास मदत करतात. ✽ कमी वेळात अधिक परिणामकारक नियोजन करता येते. ✽ ChatGPT सारख्या एआय टूल्सच्या मदतीने शिक्षक विविध अध्यापन पद्धती आत्मसात करू शकतात.



✽ **व्हिडिओ ट्युटोरियल्स तयार करणे** व्हिडिओ हे विद्यार्थ्यांसाठी आकर्षक माध्यम ठरते. Veed, Synthesia, Canva, Lumen5 आणि InVideo यांसारखी टूल्स वापरून शिक्षक थोड्याच वेळात आवाज, मजकूर आणि चित्रांसह प्रभावी व्हिडिओ तयार करू शकतात. ✽ व्हिडिओमुळे विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित होते. ✽ शिक्षकांना संकल्पना समजावण्यासाठी नवे माध्यम उपलब्ध होते. ✽ विद्यार्थी हे व्हिडिओ पुन्हा पाहून स्वतः:च्या गतीने शिकू शकतात.

**दृश्य साहित्य तयार करणे** (Visual Aids) :- शिकवताना फोटो, आकृती आणि चार्ट्सचा उपयोग समज वाढवतो. ChatGPT, Midjourney, Canva, Leonardo यांसारखी टूल्स वापरून शिक्षक आकर्षक दृश्य साहित्य तयार करू शकतात. ✽ Canva हे टूल वापरण्यास अतिशय सोपे आणि लोकप्रिय आहे. ✽ दृश्य साहित्यामुळे शिकण्याची प्रक्रिया आनंददायी आणि लक्षवेधी होते. ✽ प्रश्नपत्रिका आणि चाचण्या तयार करणे. विद्यार्थ्यांचे आकलन तपासण्यासाठी प्रश्नपत्रिका आवश्यक असते. ChatGPT, Claude, Quizizz, Quizalize, Quizlet आणि Socrative यांसारखी एआय टूल्स शिक्षकांना विविध प्रकारचे प्रश्न पटकन तयार करण्यास मदत करतात. ✽ बहुविकल्पीय, रिक्त जागा, योग्य-अयोग्य इत्यादी प्रकार सहज तयार होतात. ✽ शिक्षकांना एकाच वेळी अनेक प्रश्न मिळतात. ✽ विद्यार्थ्यांना तत्काळ फीडबॅक मिळतो, ज्यामुळे शिकण्याची गुणवत्ता वाढते.

**शैक्षणिक खेळ तयार करणे:-** Kahoot, Gimkit, Blooket, Flippity आणि JeopardyLabs यांसारख्या प्लॅटफॉर्मवर शिक्षक मजेशीर आणि शैक्षणिक खेळ तयार करू शकतात. ✽ खेळांमुळे विद्यार्थी उत्साहाने शिकतात आणि एकमेकांशी स्पर्धा करतात. ✽ Eduaide.AI सारख्या टूल्सवर वेगळ्या प्रकारचे खेळही तयार करता येतात.

**ऑडिओ साहित्य तयार करणे** ElevenLabs, Speechify, Otter आणि Wondercraft यांसारखी टूल्स वापरून शिक्षक मजकूराचे आवाजात रूपांतर करू शकतात. ✽ ऐकून शिकण्यामुळे भाषा सुधारते आणि अभ्यास सोपा होतो. ✽ प्रवासात किंवा विश्रांतीच्या वेळेतही शिक्षण शक्य होते. या एआय टूल्समुळे शिक्षकांचा वेळ वाचतो, मेहनत कमी होते आणि अध्यापन अधिक सर्जनशील, रंगतदार आणि प्रभावी बनते. मात्र, तंत्रज्ञान वापरणे हेच अंतिम उद्दिष्ट नसून, त्याचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी शिक्षण देणे हे खरे ध्येय आहे. एआयच्या मदतीने शिक्षण अधिक आनंददायी, सहभागी आणि प्रेरणादायी बनते. शिक्षकांना नवचैतन्य मिळते आणि विद्यार्थ्यांचा शिकण्याचा उत्साहही द्विगुणित होतो..!

**– अमोल कांबळे**
न्यू हायस्कूल (थर्मल) परळी.वै.